# मिरा भाईदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०१/१२/२०२१ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| **३२. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/०९/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | **उत्तर** |
|---|---|---|
| १) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत कोणकोणत्या विकासकाने किती किती रक्कमेची भरणा केलेला आहे. | | **नगररचना विभाग :-** सदर प्रकरणी सन 2017-18 पासून सन 2020-21 पर्यंत या कार्यालयात उपलब्ध तपशीलवार माहिती परिशिष्ठ - “अ” मध्ये यासोबत देण्यात येत आहे.<br>**लेखा विभाग :-** सदर माहिती सोबत जोडण्यात येत आहे. रु. 74,29,41,334/- |
| अ) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत किती रक्कम जमा झालेली आहे. | | **नगररचना विभाग :-**सदर प्रकरणी सन 2017-18 पासून सन 2020-21 पर्यंत या कार्यालयात उपलब्ध तपशीलवार माहिती परिशिष्ठ - “ब” मध्ये यासोबत देण्यात येत आहे.<br>**लेखा विभाग :-** सदर माहिती सोबत जोडण्यात येत आहे. रु. 74,29,41,334/- |
| ब) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत कोणकोणत्या विकासकाने अनामत रक्कमेचा परतावा मागितलेला आहे. | | **नगररचना विभाग :-** सदर प्रकरणी सन 2017-18 पासून सन 2020-21 पर्यंतची या कार्यालयात उपलब्ध तपशीलवार माहिती परिशिष्ठ - “क” यासोबत देण्यात येत आहे.<br>**लेखा विभाग :-** सदर माहिती सोबत जोडण्यात येत आहे. रु. 9,58,10,923/- |
| क) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत किती रक्कमेचा परतावा करण्यात आलेला आहे. | | **नगररचना विभाग :-** (प्रपत्र “क”)<br>**लेखा विभाग :-** रक्कम रु. 9,58,10,923/- |
| ड) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम ही कोणत्या महापालिका अधिनियमानुसार रक्कम आकारण्यात येत असते. | | **नगररचना विभाग :-** सदर प्रकरणी महानगरपालिका कार्यालयीन आदेश क्र. मनपा/नर/34/2011-12 दि.07/04/2011 नुसार मालमत्ता कर अनामत रक्कम वसूल करणेत येत आहे.<br>उपरोक्त प्रकरणी दि.29/08/2009 रोजीच्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.5.3x and xi (Appendix - 1) नुसार अनामत रक्कम वसुल करण्यात येते. (प्रपत्र “ड”)<br>**लेखा विभाग :-** मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.मनपा/नर/34/2011-12, दि. 07 एप्रिल 2011 रोजीच्या आदेशाची छायांकित प्रत सोबत जोडण्यात येत आहे. |
| इ) बांधकाम परवानगी वेळेस आकारणी करण्यात येणा-या मालमत्ता अनामत रक्कम या शिर्षाखाली सन २००९ पासुन ते मार्च २०२१ पर्यंत जमा झालेली अनामत रक्कम महापालिकेव्दारे कोणत्या नियमानुसार व कोणत्या विकास कामाकरीता खर्च करु शकते. | | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 प्रकरण 20 मधील कलम 299 अन्वये परतावा योग्य असलेल्या ठेवींचा तीन पूर्ण लेखांकन वर्षाकरीता दावा सांगण्यात आला नाही. तर अशा अनामत रकमा व्यपगत होतील आणि व्यपगत अनामत खाते या शिर्षाखाली नगरपालिका निधीमध्ये हस्तांतरीत होतील. सदरची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यतेने पूर्ण झालेनंतर सदर रकमा विकास कामांकरीता खर्च करण्यात येतील. |
| ई) महापालिका वार्षिक अंदाजपत्रकामध्ये कोणत्या लेखा शिर्षाखाली | | सदर अनामत रकमा या संबंधीतांना परत करावयाच्या असतात. त्यामुळे अद्यापपर्यंत सदर रकमा |

| | | |
|---|---|---|
| सदरची अनामत रक्कम दाखविण्यात येत असते. | | अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या नाही. |
| उ) मनपाकडे जमा होणारी अनामत रक्कम परतावा मिळणेकरीता ठेकेदाराने मा.न्यायालयात दावा दाखल आलेला आहे किंवा कसे ? असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. | | निरंक |
| **३३. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) मनपा आस्थापनेवर एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत व त्यांच्या वेतनावर मनपामार्फत किती खर्च करण्यात येत असतो याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. | | मिरा भाईंदर महानगरपालिकेत आस्थापनेवर एकुण कार्यरत अधिकारी/कर्मचारी 1306 असून माहे ऑक्टोंबर 2021 चे वेतन रक्कम रू.6,49,68,502/- आहे. |
| अ) मनपा आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या वेतनावर शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार ठराविक टक्क्यापर्यंत खर्च करण्यात येतो किंवा शासनाने ठरवून दिलेल्या धोरणापेक्षा जास्त प्रमाणात खर्च करण्यात येत असतो याबाबतची माहिती देण्यात यावी. | | मिरा भाईंदर महानगरपालिकेत आस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार 35 टक्क्यांपर्यंत खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु सन 2020-21 या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांच्या वेतनावर 44 टक्के खर्च झालेला आहे. |
| ब) मनपा आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या वेतन अदा करणेकरीता मनपामार्फत वार्षिक अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करण्यात येत आहे किंवा कसे व वाढीव तरतुद केल्यास ती कोणात्या आधारे करण्यात येते याबाबतची माहिती देण्यात यावी. | | मनपा आस्थापनेवर मंजूर आकृतीबंधातील पदानुसार वार्षिक अर्थसंकल्पाची तरतुद करण्यात येते. |
| क) शासनामार्फत मनपा आस्थापनेवर विविध वर्ग - १ पदाकरीता अधिका-यांची नियुक्ती करण्यात येत असते सदर अधिका-यांच्या वेतनावर मनपामार्फत किती खर्च करण्यात येत असतो याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. | | शासनामार्फत मनपा आस्थापनेवर वर्ग-1 अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. सदर अधिकाऱ्यांच्या वेतनाची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे. |
| **३४. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) सन २००२ ते आजपर्यंत एकूण किती अधिकारी / कर्मचारी यांच्यावर लाचलुचपत पथकामार्फत किती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती. | | लाचलुचपत पथकामार्फत एकुण 21 अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.01 ते पृष्ठ क्र.05 मधील स्तंभ क्र.02 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. |
| अ) लाचलुचपत पथकामार्फत किती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणात्या स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता व त्यांना किती कालावधीकरीता निलंबित करण्यात आलेले होते याबाबतची माहिती. | | सदरची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.01 ते पृष्ठ क्र.05 मधील स्तंभ क्र.03 व 04 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ब) लाचलुचपत पथकामार्फत कारवाई करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या अटीशर्तीच्या अधीन राहून पुन:श्च मनपा सेवेत सामाऊन घेण्यात आले याबाबतची माहिती. | | लाचलुचपत पथकामार्फत कारवाई करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना मा.निलंबन आढावा समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार पुन:श्च मनपा सेवेत सामावुन घेण्यात आलेले आहे. मा.निलंबन आढावा समितीच्या बैठकीचे इतिवृतांत तसेच शासन निर्णय व नियमावलीची माहिती पृष्ठ क्र.14 ते पृष्ठ क्र.71 सोबत जोडून देण्यात येत आहे. |
| क) सदर अधिकारी / कर्मचारी हे सद्यस्थितीत मनपामध्ये कोणत्या पदावर कार्यरत आहेत व त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती. | | सदर अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. तसेच सदर अधिकारी/कर्मचारी हे सद्यस्थितीत मनपामध्ये ज्या पदावर कार्यरत आहेत त्याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.01 ते पृष्ठ क्र.05 मधील स्तंभ क्र.04 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.<br>सदर अधिकाऱ्यांपैकी श्री. स्वप्निल सावंत यांना उप-आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यात आलेली नसुन जा.क्र.मनपा/आस्था/1138/2021-22 दि.20/08/2021 रोजीच्या आदेशान्वये तात्पुरत्या स्वरूपात उप-आयुक्त या पदाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे. |
| ड) मनपा सेवेत कार्यरत असणारे ज्या अधिकारी / कर्मचारी यांना विविध गुन्हाखाली लाच अथवा इतर अन्य विविध कारणास्तव मा.आयुक्त यांनी निलंबित केलेले अधिकारी व कर्मचारी यांची माहिती देण्यात यावी. | | सदरची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.06 ते पृष्ठ क्र.13 मधील स्तंभ क्र.02 व 03 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. |
| इ) मनपा सेवेतील विविध आरोपाखाली मा.आयुक्त व मा.महासभेत ठराव पारित करुन निलंबित केलेले अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या गुन्हानुसार व किती कालावधीसाठी करण्यात आले तसेच सदर अधिकारी / कर्मचा-यांना कोणत्या आधारे कोणत्या अटीशर्तीच्या अधीन राहून पुन्हा मनपा सेवेत व कोणत्या पदावर सामाऊन घेण्यात आले याबाबतची माहिती. | | सदरची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.06 ते पृष्ठ क्र.13 मधील स्तंभ क्र.02 व 03 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. |
| ई) मा.आयुक्त यांनी व मा.महासभेत ठराव पारित करुन निलंबित केलेले अधिकारी / कर्मचारी यांना सद्यस्थितीत कोणत्या पदावर कार्यरत असून त्यांना पदोन्नती केव्हा देण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती. | | सदरची माहिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र.06 ते पृष्ठ क्र.13 मधील स्तंभ क्र.02 व 03 मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. |
| उ) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कारवाई झालेल्या अधिकारी तथा कर्मचारी यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना अशा अधिकारी तथा कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात येऊ नये असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असून याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय देखील जारी केलेला आहे या आदेशाचे पालन मिरा भाईंदर महानगरपालिकेने ततोंतत केलेले असल्यास अथवा नसल्यास त्याची माहिती द्यावी. या आदेशाचे पालन | | लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कारवाई झालेल्या अधिकारी तथा कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| केलेले नसल्यास सुधारीत फेर आदेश जारी करण्याबाबत प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. | | |
| **३५. श्री. भगवती शर्मा मा. सदस्य यांनी दि. ०७/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर ठेका पध्दतीने सन २००२ ते २०२१ या कालावधीत (प्रती वर्ष) विविध विभागा अंतर्गत ठेका पध्दतीने एकूण किती कर्मचारी कार्यरत करण्यात आलेले आहेत व त्यांच्या वेतनावर आजपर्यंतचा मनपामार्फत किती खर्च करण्यात आलेला होता? याबाबतची प्रतीवर्षनिहाय सविस्तर माहिती देण्यात यावी. | | **आस्थापना विभाग :-** सोबत जोडून देत आहोत.<br>**अतिक्रमण विभाग :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात अनधिकृत फेरीवाल्यांवर परिणामकारक कारवाई करणेबाबत सन्मा. सदस्यांकडून वारंवार मागणी होत आहे. याकरीता प्रभाग समिती कार्यालय क्र.1 ते 6 मध्ये एकूण 60 मजूर उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावित होते.<br>मा. स्थायी समिती सभा दि. 05/05/2021 ठराव क्र. 18 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफाई / खोदाई करणेकामी हंगामी कंत्राटी मजूर पुरवठा करणे कामाच्या मे. एम. ई. प्रोजेक्ट लि. यांच्या निविदेतील दर रुपये 999/- प्रती मजूर / प्रती दिवस यास मंजूरी प्राप्त आहे. सदर दराप्रमाणे कंत्राटदार मे. एम. ई. प्रोजेक्ट लि. यांना प्रभाग समिती कार्यालय क्र. 1 ते 6 मध्ये अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी एकूण 60 मजूर उपलब्ध करुन देणेस या कामी होणारा खर्च सन 2021-22 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्षक आरोग्य व सोयी 4) वॉर्ड साफसफाई यामधील तरतुदीतून करणेस मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार दि. 11/10/2021 रोजी पासून संबंधीत ठेकेदाराकडून अनधिकृत फेरीवाले हटविणेकामी 60 मजूरांचा पुरवठा करुन दिला जात आहे. याकामी दि. 31/03/2022 रोजी पर्यंत रक्कम रु. 1.02 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. |
| **३६. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २६/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) शासनाच्या बहुतेक कार्यालयामध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती दिवशीच सर्व सेवानिवृत्तीचे लाभ मिळतात तशी तरतुद आहे. त्याप्रमाणे म.न.पा. सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीच्या दिवशीच सर्व लाभ मिळावेत अशी मागणी नगरसेवक ह्यांनी दि. 07/09/2021 च्या दरम्यान केली आहे हे खरे आहे काय? | | होय. |
| अ) असल्यास, ह्यापूर्वी कर्मचाऱ्यांना असे लाभ न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत? | | 1. सेवापुस्तकातील नोंदी अपुर्ण असल्याने<br>2. वेतन पडताळणी न झाल्याने<br>3. वेळोवेळी कर्मचारी गैरहजर असल्याने त्यांचे वार्षिक वेतनवाढ सुनिश्चित केल्याशिवाय सेवानिवृत्ती वेतन अदा करण्यास सर्वसाधारण अशी कारणे आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ब) ह्या संदर्भात म.न.पा. प्रशासनाची भूमिका काय आहे? सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सर्व लाभ सेवा निवृत्तीच्या दिवशी देणेबाबत तत्सबंधीचा प्रशासकीय आदेश केव्हा काढण्यात येईल? | | सदर मुद्द्याबाबत जा.क्र.मनपा/आस्था/ 1773/ 2021-22 दि.25/11/2021 रोजी प्रशासना मार्फत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. व सदरचा आदेश संबंधित विभागांना वाटप करण्यात आलेला आहे. |
| **३७. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) म.न.पा. ने शहरातील उद्याने, मैदाने, स्मशानभूमी व दुभाजके निगा व देखभालीसाठी ठेकेदार नेमले आहे त्या कामापैकी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व प्रभाग समिती क्र.3 मधील आरक्षण क्र. 122क मैदान (सचिन तेंडूलकर मैदान) ह्यामधील अनावश्यक गवत काढणे, मैदानातील गवत कटींग करणे, फक्त ह्या कामापोटी एप्रिल 21 ते सप्टेंबर 21 ह्या कालावधीतील कामासाठी अनुक्रमे रु. 83,29,499/- व रु. 51,56,432/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत अशी शहरामध्ये चर्चा आहे हे खरे आहे काय? | | हे खरे नाही. सदर बाबतचा वस्तुस्थिती अहवाल खालील प्रमाणे<br>मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल २ वर्ष कालावधीकरीता करणेकामी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मिभाम-११२० /प्र.क्र. /४६ /नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये मा. स्थायी समिती प्रकरण क्र. ३० दि.१७/०८/२०२० मधिल गोषवाऱ्यानुसार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दराची निविदा मंजुर केली आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या मंजुरीने करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार माहे एप्रिल २०२१ ते सप्टेंबर २०२१ ह्या कालावधीत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाकरीता रु.७८,१९.६५९/- व प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदानाकरीता (सचिन तेंडुलकर मैदान) रु.३६,८०,३०६/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत<br>तसेच दि.१२/०४/२०२१ रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. २१ नुसार मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणच्या मोजमापबद्दल काही तक्रारी आल्यास दोन्ही पक्षकाराच्या समोर (महानगरपालिका व ठेकेदार) पुनशःच सदर ठिकाणची मोजमाप घेण्यात येईल. केलेल्या मोजमापाप्रमाणे देयक कमी जास्त झाल्यास त्यानुसार संबधित पक्षकाराकडुन वसुल करण्यात येईल असे नमुद आहे.<br>नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाचे एकुण क्षेत्रफळ ६५००० चौ.मी.(म्हणजेच १६ एकर) असुन सदर मैदानावर देनंदिन १५ ते २० मजुर व अत्याधुनिक मशीनरी मार्फत निगा व देखभालचे काम करण्यात येत आहे.<br>प्रभाग समिती क्र. ३ मधील आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) येथील जा.क्र.मनपा/साबां/९३०६/२०१९-२० दि.२०/१२/२०१९ अनव्ये मे. राणे कन्सलटंट यांना मोजमाप करणेबाबत बांधकाम विभागाने कार्यादेश दिला होता(सोबत मा. कार्यकारी अभियंता यांचे पत्र जोडलेले आहे). त्यामध्ये आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे मोजमाप ४१,७४९ चो.मी. क्षेत्रफळ असे देण्यात आलेले होते(सोबत नकाशा जोडलेला आहे). तथापि, सदर मैदानाची पाहणी केली असता सदरचे मोजमाप जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याप्रमाणे माहे ऑगस्ट२१ पासुन सदर मैदानाचे क्षेत्रफळ कमी करुन केलेल्या कामाप्रमाणे देयक अदा करण्यात येत आहे(सोबत तक्ता जोडलेला आहे). तसेच यापुर्वी माहे एप्रिल-२१ ते जुले-२१ पर्यंतचे आरक्षण क्र. १२२क मैदान (भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान) चे जास्तीचे देयक रु.२५,२३,८७७/- माहे ओक्टोंबर२१ च्या देयकातुन कपात करण्यात आलेले आहे(सोबत तक्ता जोडलेला आहे). |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक मैदानातील एस्टीमेटमधील स्पेसिफिकेशननुसार प्रत्येक ॲटमवार झालेले काम, अदा केलेली रक्कम, महिनानिहाय तपशिलवार माहिती देण्यात यावी. | | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ब) MAC 1971 नियम 180 प्रमाणे ठेक्याच्या झालेल्या कामाची बाबनिहाय नोंदी मोजणी पुस्तकामध्ये (MAC 1971 नियम 136) घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी त्यातील दर (मुळ एस्टीमेट दराप्रमाणे आहेत किंवा नाही) तपासूनच देयके अदा करण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी तपासून देयके अदा केली आहेत किंवा कसे? मोजणी पुस्तकातील नोंदी कोणी तपासल्या आहेत? | | उपरोक्त नमुद प्रमाणे निगा व देखभालीच्या कामाची तांत्रिक तपासणी कनिष्ठ अभियंता, प्र. उप-मुख्य उद्यान अधिक्षक व उप-आयुक्त(उद्यान) यांचेमार्फत वेळोवेळी करत असतात मोजमापानुसारच रजिस्टर / मोजमाप पुस्तिके(MB) मधील नोंदी तपासुन मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांच्या तपासणी नंतरच मा. अतिरीक्त आयुक्त व मा. आयुक्त यांच्या मान्यतेने देयक अदा करणेत येते. |

**(मारुती गायकवाड)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**